# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## इंटरनेट विभाग (वेबसाईट सेल )

## परिपत्रक

सर्व अधिविभाग प्रमुख व विभाग प्रमुख यांना आदेशानुसार कळविण्यात येते की विद्यापीठाच्या वेबसाईट वरती ठेवण्यात येणाऱ्या माहिती संबंधीत खालील प्रमाणे कार्यवाही आपल्या विभागामार्फत करण्यात यावी.

१. आपल्या विभागाची माहिती pdf format मध्ये देण्यात यावी.

२. सदर माहिती ईमेल द्वारे ( webmaster@unishivaji.ac.in ) अथवा पेन ड्राईव्ह मधून वेबसाईट सेल मध्ये देण्यात यावी.

३. आपल्या विभागाची माहिती विद्यापीठाच्या वेबसाईट मधील कोणत्या लिंक/ पेज वर ठेवण्यात यावी याबाबत स्पष्ट माहिती ईमेल मध्ये / अंतर्गत कार्यालयीन टिपणी मध्ये देण्यात यावी

४. आपल्या विभागाची माहिती ज्या वेबपेज वर ठेवण्यात येणार आहे त्या लिंकचे नाव स्पष्टपणे ईमेल / अंतर्गत कार्यालयीन टिपणीमध्ये देण्यात यावे.

५. वेबसाईट सेल विविध विभागाकडून येणारी माहिती विद्यापीठाच्या वेबसाईटवर ठेवण्याचे व मुदत संपल्यानंतर सदर माहिती किती तारखेपर्यंत वेबसाईटवर ठेवावी याबाबत स्पष्ट निर्देश ईमेल / अंतर्गत कार्यालयीन टिपणी मध्ये देण्यात यावेत.

६. संबंधीत विभाग दिलेल्या माहितीबद्दल जबाबदार राहतील. या संदर्भात येणाऱ्या सर्व पत्रव्यवहार माहिती अधिकार इ. संबंधीत विभागाने बघावा लागेल.

७. वेबसाईट वरील आपल्या विभागाची माहिती बिनचूक आहे व सुधारित आहे याची खात्री वेळोवेळी करावी व काही बदल असल्यास तातडीने वेबसाईट मार्फत करून घ्यावा.

दि. १२/०७/२०१८ रोजी पाठवलेल्या परिपत्रकाद्वारे सर्व विभागांनी आपली माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील बिनचूक करून घावी असे कळविले होते परंतु त्याला अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. विविध संघटना , विध्यार्थी , पालक यांचे संकेतस्थळावरील माहिती अपुरी , जुनी किंवा सदोष असल्याबद्दलचा पत्र व्यवहार होत आहे , तरी पुन्हाएंकदा सर्वाना विनंती करण्यात येते कि , आपल्या विभागाची संकेतस्थळावरील माहिती तपासून घ्यावी व काही चुका असतील तर त्या तातडीने वेबसाईटसेल कडून दुरुस्त करून घ्याव्यात.

तरी वरील प्रमाणे सर्व अधिविभाग व विभागांनी कार्यवाही करावी.

मा. कुलसचिव

संदर्भ :- शि.वि / इंटरनेट विभाग / वेबसाईट/

दिनांक :- ३१ जानेवारी २०१९

प्रत,

१. सर्व अधिविभाग प्रमुख, संचालक, समन्वयक, प्रशासकीय विभाग प्रमुख, यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी

२. सदर परिपत्रक इंट्रानेटवर ठेवणे बाबत.

Scanned by CamScanner